प्रेसनोट

पुणे दिनांक ०१/०३/२०१९

## ॲक्टिव्हा स्कुटर चोरणारे इराकी नागरीकास गुन्हे शाखा युनिट – ४, कडून अटक.

दिनांक २७/०२/२०१९ रोजी युनिट -४,गुन्हे शाखेकडील स्टाफ येरवडा पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलींग फिरत असताना स.पो.फौज अब्दुल करीम सय्यद व पो.हवा गणेश साळुंखे यांना त्याचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की लेन नं ३, शिवनेरी नगर कोंढवा येथे एक इसम पल्सर मोटर सायकलवर फिरत असुन त्याने ती चोरुन आणली आहे अशी खबर मिळाल्याने बातमीचे ठिकाणी सापळा रचला असता बातमी प्रमाणे इसम नामे **अक्रम अल्बदेअरी फैज अल्बदेअरी वय २० वर्षे रा. सध्या गल्ली नं ३,शिवनेरी नगर, कोंढवा पुणे मुळ रा.ग्रिन व्हॅली जवळ,हिमायत बाग, औरंगाबाद** हा मिळुन आला. तपासामध्ये त्याने इराकी नागरीक असल्याचे व युनायटेड नेशनचे हायकमीशर फॉर रेफ्युजी स्टेटस,न्यु दिल्ली यांचे पत्रावर तो भारतामध्ये सुमारे १२ वर्षापासुन रहावयास असल्याचे सांगीतले आहे. त्यास गुन्हयात अटक करुन त्याचेकडे तपास करता त्याने व त्याचा साथीदार औस अलहेंनदी वय ३३ वर्षे रा. कुमार संसार बिल्डींग ,कोंढवा पुणे मुळ रा.दिल्ली याने ॲक्टिव्हा स्कुटर चोरल्याचे कबुल करुन तीन ॲक्टिव्हा स्कुटर काढुन दिल्या आहेत. आरोपी याचेकडुन

१) **कोंढवा पो.स्टे. गु.र.नं.४१९/२०१८** भा.द.वि.कलम ३७९ मधील ५२,०००/- रु कि.ची होंडा ॲक्टिव्हा स्कुटर नं. MH12NZ9551

२) **कोंढवा पो.स्टे.गु.र.नं.२७/२०१७** भा.द.वि. कलम ३७९ मधील ४५,०००/- रु कि.ची होंडा ॲक्टिव्हा स्कुटर नं.MH12JP5147

३) **चतुश्रृंगी पो.स्टे.गु.र.नं.१७८/२०१८** भा.द.वि.कलम ३७९ मधील ५२,०००/- रु कि.ची होंडा ॲक्टिव्हा स्कुटर नंबर MH14FK2708

४) **बेगमपुरा पो.स्टे.औरंगाबाद शहर** गु.र.नं. ८५/२०१८ भा.द.वि. कलम ३७९ मधील ६०,०००/- रु कि.ची पल्सर मो.सा.नं MH20ER9244

अशा एकुण २,०९,०००/- रु कि.च्या चार दुचाकी गाड्या जप्त करणेत आलेल्या आहेत.दाखल गुन्हयाचा तपास चालु असुन त्याचेकडुन आणखी दुचाकी वाहने चोरीचे गुन्हे उघडकीस येणेची दाट शक्यता आहे.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री. भानुप्रताप बर्गे, यांचे मार्गदर्शनाखाली अंजुम बागवान, पोलीस निरीक्षक,युनिट -४, गुन्हे शाखा,पुणे शहर व स.पो.नि.गणेश पवार,स.पो.नि अश्विनी जगताप, स.पो.फौज अब्दुल सय्यद, भालचंद्र बोरकर व कर्मचारी गणेश साळुंके, रमेश साबळे, सचिन ढवळे, गणेश काळे, अतुल मेंगे, रमेश राठोड, शितल शिंदे, हनुमंत बोराटे यांनी केलेली आहे.